www.sgbauonline.com



First Semester B. Sc. – I Examination

# MARATHI COMPULSORY

# (मराठी अनिवार्य)

P. Pages : 3

वेळ : तीन तास ] [ एकूण गुण : 40

---

1. 'पुरूष सूक्त' ह्या विज्ञान कथेतून लक्ष्मण लोंढे यांनी मानवाच्या उत्क्रांतीच्या वास्तववाद्वारे कोणत्या कथात्मतेची प्रचीती आणून दिली आहे ?

**किंवा**

संत गाडगेबाबांच्या किर्तनशैलीतून त्यांनी कोणत्या समाजविघातक बाबींवर ताशेरे ओढले आहेत ? सोदाहरण स्पष्ट करा. 10

2. खालीलपैकी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवा :—

(अ) महात्मा ज्योतिराव फुलेंचे क्रांतिकारी विचार विशद करा.

(ब) ''वैज्ञानिक कथेचा आशय व विषय वैज्ञानिक पायाभूतच असावा.'' असे चंद्रकांत पाटील यांना कां वाटते ?



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

(क) 'लोकभ्रम' ह्या पाठातून विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी कोणत्या लोककल्पना मांडल्या आहेत ?

(ड) 'नवा करार हा ख्रिस्ताच्या शिकवणीचा अजोड ठेवा आहे.'' ह्या विधानाची उकल करा. 10

3. खालीलपैकी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवा :—

(अ) संत ज्ञानेश्वरांचे 'पसायदान' ही मराठी अक्षर लेणी आहे ह्या मताची चर्चात्मक मांडणी करा.

(ब) 'डोईचा पदर' ह्या अभंगातील संत जनाबाईची विद्रोही भूमिका लिहा.

(क) 'टिळा टोपी उंच दावी' ह्या संत तुकारामाच्या अभंगाचे रसग्रहण करा.

(ड) सज्जनांची कोणती रूपे 'जैसा वृक्ष नेणे..... ह्या अभंगातून संत नामदेवांनी सांगितली आहेत ? 10

4. खालीलपैकी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवा :—

(अ) कार्यालयीन टिप्पणी लेखनाच्या पध्दती लिहा.

(ब) माहितीच्या अधिकारान्वये भूमिअभिलेख कार्यालयाकडून माहिती मिळविण्याच्या पत्राचा नमूना तयार करा.

(क) श्री शाश्वत तेजराव तेलगोटे लोकमान्य महा. अकोट, जि. अकोला ह्या नावाने मा. सहसंचालक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती ह्यांच्या नावे नापरतावा



अग्रीम राशी दोन लाख रूपयांच्या मागणीचे पत्र लिहा. पत्राचे कारण घरबांधकाम दाखवून सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीतून रक्कम मागावयाची आहे.

(ड) शिक्षण सहसंचालक उच्चशिक्षण विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचेकडून प्रा. छाया हरीभाऊ भवरे महिला महाविद्यालय पुसद, जि. यवतमाळ भविष्य निर्वाह निधीतून 'ना परतावा' रक्कम काढण्यास मंजूरीबाबतचे पत्र लिहा. 10



www.sgbauonline.com